# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण २८, १९४५ ( शके )**

**मुख्यमंत्री :- यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २२**

---

### नेरूळ (नवी मुंबई) येथील महानगरपालिका क्षेत्रातील भूखंडावर बेकायदा इमारती बांधल्याबाबत

**(१) * ७३८४८ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरुळ (नवी मुंबई) येथील सेक्टर १६-ए येथील महानगरपालिका शाळेजवळ असलेला भूखंड सिडको प्रशासनाने उद्यानाकरीता आरक्षित केलेला असताना नवी मुंबई महानगरपालिकेला दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भूखंडावर भूमाफियांनी बेकायदेशीररित्या कब्जा करून त्रिमूर्ती कॉम्प्लेक्स व कृष्णा कॉम्प्लेक्स अशा दोन अनधिकृत इमारती बांधुन १४० सदनिकांची विक्री केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर भुखंडावर बेकायदा कब्जा करून, त्रिमुर्ती कॉम्लेक्स व कृष्णा कॉम्प्लेक्स अशा दोन अनधिकृत इमारती उभारल्या असून, सदर इमारतींचा अनधिकृतपणे रहिवाशी वापर सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) सदर भूखंडावर अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित विकासकास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ नुसार नोटीस देण्यात आली होती. तथापि, सदर इमारतीमधील रहिवाशी यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता, प्रथमत: मा.उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिले होते. परंतु तदनंतर मा.उच्च न्यायालयाने सदरची याचिका फेटाळली.

मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाविरूध्द सदर इमारतींमधील रहिवाशी यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता, मा.सर्वोच्च न्यायालयाने सदरच्या इमारती रिकामी करण्यास सहा महिन्याची मुदत देऊन याचिका निकालात काढली.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेली मुदत संपल्याने, आदेशानुसार सदरच्या इमारती रिकामी करण्याची नियमोचित कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान देखभाल व दुरुस्तीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(२)** * **७४९५९ श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेने बेलापूर ते दिघा कार्यक्षेत्रातील उद्यान देखभाल दुरुस्ती व संवर्धनाच्या कामासाठी निविदा प्रक्रिया राबवून १० ठेकेदारांना काम देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या करारानुसार सदर काम केले नसून यामध्ये १४ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी समाज समता कामगार संघटनेचे सचिव, श्री.मंगेश लाड यांनी नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त व पोलीस आयुक्त यांचेकडे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) उद्यान देखभाल, दुरूस्ती व संवर्धन या कामामध्ये १४ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे व त्याची चौकशी करावी, अशा आशयाची तक्रार महानगरपालिका प्रशासनास प्राप्त झाली, हे खरे आहे.
(४) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील उद्यानाचे देखभाल, दुरुस्ती व संवर्धनाकरिता सन २०२१ मध्ये निविदा प्रक्रिया राबवून २ वर्षासाठी १० कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली होती.

सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करतांना उद्याने व उपवने देखभाल व दुरूस्तीच्या मापदंडाप्रमाणे २२०० चौ.मी. साठी एक कामगार याप्रमाणे मापदंड वापरण्यात आला आहे.

सदरचे काम समाधानकारक झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कंत्राटदारास दंड आकारण्यात येतो. देयके अदा करतांना सदर दंडाची रक्कम वजा करून देयके अदा केली जातात. तसेच, कामगारांना कंत्राटदाराकडून पुरविल्या जाणाऱ्या सुविधांचीही पडताळणी महानगरपालिकेमार्फत करण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.

तक्रारीच्या अनुषंगाने वस्तुस्थिती तक्रारदारास महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ऑपेरा हाऊस (मुंबई) येथील मेहता महल (दृष्टी महल) या इमारतीबाबत

**(३)** * **७१८४२ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ऑपेरा हाऊस येथील चर्नीरोड रेल्वे स्थानकासमोर असलेली मेहता महल (दृष्टी महल) ही इमारत ५० वर्षाहून अधिक जुनी असून आय.आय.टी. सारख्या मान्यता प्राप्त संस्थेने धोकादायक असल्याचे आपल्या अहवालात स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या व्यावसायिक इमारतीत दररोज ३०० ते ४०० लोकांचा वावर असून उक्त इमारत संरचनात्मकदृष्टया धोकादायक असल्याची बाब वेळोवेळी महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त, 'डी' प्रभाग यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्यानंतरही महानगरपालिकेकडून यासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच इमारत धोकादायक नसून तात्काळ रिक्त करून पाडून टाकणे आवश्यक नसल्याचाही अहवाल पालिकेच्या तांत्रिक सल्लागार समितीने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एकीकडे महानगरपालिका केवळ ३० वर्षे जुन्या असलेल्या इमारती देखील धोकादायक घोषित करत असतानाही, सदर जुनी इमारत आय.आय.टी. सारख्या मान्यता प्राप्त संस्थेने धोकादायक असल्याचे स्पष्ट करण्यात आल्यानंतरही महानगरपालिकेने सदर प्रकरणी अदयाप निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त धोकादायक इमारतीबाबत निर्णय घेऊन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) मुंबईतील ऑपेरा हाऊस येथील मेहता महल (दृष्टी महल) या ५० वर्षांहून अधिक जुन्या असलेल्या इमारतीचे चेअरमन / सेक्रेटरी / मालक / ताबेधारक / सदस्य यांनी सदर इमारत सी-२ बी (संरचनात्मक दुरुस्ती करण्याजोगी) व जमीन मालक मे.दृष्टी हॉस्पिटॅलिटी कं. प्रा. लि. यांनी सी-१ (धोकादायक) श्रेणीत मोडत असल्याचा परस्परविरोधी संरचनात्मक अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेस सन २०२० मध्ये सादर केला.

तदनंतर सदर प्रकरणी दिनांक १७.१२.२०२० रोजीच्या बैठकीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार समितीने सदर इमारत सी-२ बी श्रेणीत येत असल्याचा व सदर इमारतीस रिकामी न करता तिच्या संरचनात्मक दुरुस्तीची गरज असल्याचा निष्कर्ष दिला.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार समितीच्या सदर निष्कर्षानुसार मेहता महल इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरु असताना जमीन मालकाने सदर इमारत सी-१ श्रेणीत येत असल्याचा आय.आय.टी., मुंबई यांचा संरचनात्मक अहवाल दिनांक १९.०५.२०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केला. तथापि सदर इमारतीच्या चेअरमन / सेक्रेटरी / मालक / ताबेधारक / सदस्य यांनी जमीन मालकाच्या अहवालाबाबत हरकत असल्याचे कळवून मेहता महल इमारत सी-२ बी श्रेणीत येत असल्याचा पुन:श्च अहवाल दिनांक १४.०६.२०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केला.

सदर प्रकरणी पुन्हा नव्याने परस्पर विरोधी संरचनात्मक अहवाल प्राप्त झाल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार समितीने सदर इमारत निरीक्षणाखाली व सुरक्षित उपाययोजना करण्याकरिताचे आदेश दिनांक १३.०७.२०२३ रोजी दिले.

तथापि, सदर प्रकरणी जमीन मालक व सदस्य यांनी मा.उच्च न्यायालात अनुक्रमे रिट याचिका क्रमांक (एल) १५३५१/२०२३ व रिट याचिका क्रमांक १८२६१/२०२३ परस्परविरोधात दाखल केल्या असून, सदर याचिका मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने तांत्रिक सल्लागार समितीने सदर प्रकरणी इमारतीच्या वर्गवारी / श्रेणीबाबत कोणतेही आदेश पारित केलेले नाहीत. तसेच मा.उच्च न्यायालय व तांत्रिक सल्लागार समितीच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मा.उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सदर दोन्ही प्रकरणे न्यायप्रविष्ठ असून, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही, करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाल्हेकरवाडी (जि.पुणे) येथे पुणे महानगर विकास प्राधिकरणाकडून बांधण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पात झालेली अनियमितता

**(४) * ७४९४८ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्यावतीने चिंचवड येथील वाल्हेकरवाडी येथील सेक्टर क्रमांक ३० व ३२ येथे आर्थिक दुर्बल व कमी उत्पन्न गटातील घटकांसाठी सन २०१६ मध्ये ७६० सदनिकांचा गृहप्रकल्प सुरु करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ७६० सदनिकांचा गृहप्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी दिनांक ६ जुलै, २०१९ पर्यंतचा असून उक्त प्रकल्पास चार वेळा मुदतवाढ घेऊनही अद्याप पूर्ण करण्यात आलेला नसल्याने तसेच मुदतवाढीनंतर दिनांक ३१ मे, २०२३ रोजी प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित असताना अद्याप पाणी, वीज व मैलाशुद्धीकरण प्रकल्प आदी पूर्ण झालेले नसल्याने आर्थिक दुर्बल घटकातील व कमी उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना पैसे भरून सदनिकेचा ताबा वेळेत न मिळाल्याने बँकेचे हप्ते व दुसरीकडे घरभाडे भरावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर गृहप्रकल्पाचे कंत्राटदार एलोरा कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांस सुमारे ६५ कोटी ८१ लाख रुपयांऐवजी भाववाढीच्या नावाखाली सुमारे ११० कोटी रुपये देण्यात आले असून कामात दिरंगाई केल्याबाबत आकारण्यात आलेला कोट्यवधी रुपयांचा दंडही माफ करण्यात आल्याची बाब दिनांक २० ऑक्टोबर, २०२३ रोजी निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकल्पातील अनियमितेत शासकीय अधिकाऱ्यांचे देखील संगनमत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पेठ क्र.३० व ३२, वाल्हेकरवाडी येथे किफायतशीर गृहयोजना राबविण्यात आलेली आहे. सदर गृहयोजनेमध्ये १RK प्रकारच्या ३७८ सदनिका व १ BHK प्रकारच्या ४१४ अशा एकूण ७९२ सदनिका बांधण्यात आल्या असून सदर गृहप्रकल्पाचे बांधकाम दि.३१.०५.२०२३ रोजी पुर्ण करण्यात आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर गृहप्रकल्पाचे काम सुरु करण्यास स्थानिकांचा झालेला विरोध, कंत्राटदाराची अपेक्षेपेक्षा कामाची कमी गती, कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे लागू झालेली टाळेबंदीमुळे बांधकाम साहित्य, मजुर इत्यादींची कमतरता तसेच प्रकल्पाच्या काही भागात लगतच्या मिळकतधारकांनी केलेले अतिक्रमण इ. कारणांमुळे गृहप्रकल्पाचे काम मुळ मुदतीमध्ये पुर्ण करण्यासाठी कंत्राटदारास अडचणी आल्यामुळे गृह प्रकल्पाच्या पुर्णत्वासाठी एकूण ४ वेळा मुदतवाढ देण्यात आली. सदर गृहप्रकल्पाचे बांधकाम दि.३१.०५.२०२३ पर्यंत कंत्राटदाराने पुर्ण केले आहे. सदर गृहप्रकल्पास सेवासुविधा पुरवण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही सुरू आहे :-

१. सदर प्रकल्पास मल:निस्सारण व्यवस्थेकरिता (ड्रेनेज) ४७५ केएलडी क्षमतेच्या एसटीपीचे काम प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आले आहे.
२. सदर गृहप्रकल्पास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून दि.२०.११.२०२३ रोजी भोगवटा प्रमाणपत्र (भागश:) प्राप्त झाले आहे.

३. सदर गृह प्रकल्पास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून पाणी पुरवठा उपलब्ध होणार असून त्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
४. सदर गृहप्रकल्पास महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (MSEDCL) यांचेकडुन WCR मिळाल्यानंतर विद्युत पुरवठा उपलब्ध होणार आहे. याकरीता प्राधिकरणाने MSEDCL यांच्याकडे प्रस्ताव दाखल केला असून विद्युत पुरवठा प्राप्त करण्याची कार्यवाही चालु आहे.
५. सदर गृहप्रकल्पास पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा व महावितरणमार्फत विद्युत पुरवठा झाल्यानंतर सदरचे गृहप्रकल्पातील लाभार्थ्यांना डिसेंबर, २०२३ अखेर पर्यंत सदनिकांचा ताबा देण्याचे नियोजित आहे.

(३) अंशत: खरे आहे.

तत्कालीन पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने विषयांकित गृहयोजना कामाच्या निविदा रक्कम रु.६५,८१,४१,३९५/- करीता निविदा मागविण्यात आल्या. सदर कामाकरीता कंत्राटदार मे.एलोरा कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांची न्युनतम दराची म्हणजेच रु.७२,४५,०४,९९८/- निविदा स्विकृत करण्यात आली व त्यांना दि.०७.०१.२०१६ रोजी कार्यादेश देण्यात आले. सदर काम पूर्ण करण्याची मुदत ४२ महिने म्हणजेच दि.०६.०७.२०१९ पर्यंत होती. निविदेनुसार कंत्राटदारास शासन निर्धारित निर्देशांकानुसार भाववाढ देय आहे.

तथापि, कंत्राटदाराची कामाची गती अपेक्षेपेक्षा कमी असल्याने तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या सभेने कंत्राटदारास निविदेतील अटी व शर्ती नुसार देय भाववाढ गोठवून अनुकंपानिधी/दंडाची एकूण रक्कम रु.१.६१ कोटीची आकारणी करण्यात आली. कंत्राटदारास एकुण ४ मुदतवाढ दिली आहे. चौथ्या मुदतवाढीचा कालावधी दि.३१.०५.२०२३ पर्यंत आहे.

तदनंतर, कंत्राटदार यांनी कोविड-२०१९ च्या प्रादुर्भावामुळे लागू टाळेबंदी, बांधकाम साहित्य, मशिनरी, कच्चा माल यांची कमतरता तसेच साहित्यांच्या दरामध्ये झालेली भाववाढ, महागाई इ. कारणामुळे अनुकंपानिधी परत मिळणे तसेच भाववाढ मिळणेबाबत कार्यालयाकडे वेळोवेळी विनंती केली. त्यानुसार कंत्राटदाराची कामाची गती समाधानकारक असल्याचे दिसून आल्याने तसेच कोविड-१९ चा प्रार्दुभाव इ. बाबींचा विचार करुन प्राधिकरण कार्यालयाने दि.०७.०६.२०२१ ते २२.०४.२०२२ व दि.०१.०४.२०२० ते ०६.०६.२०२१ या कालावधीमध्ये आकारणी केलेली अनुकंपानिधी/दंडाची रक्कम रु.५८.७० लक्ष कंत्राटदारास परत केली तसेच भाववाढ (Indices) गोठवुन कंत्राटदारास देय शासन निर्धारित प्रत्यक्ष भाववाढ निर्देशांकानुसार रक्कम रु.१६ कोटी कंत्राटदारास प्राधिकरणाने अदा केली आहे.

तथापि, कंत्राटदाराने उर्वरित कालावधी करीता अनुकंपानिधी / दंडाच्या एकुण वसूल रक्कम रु.१.६१ कोटी रक्कमेपैकी उर्वरित रु.१.०३ कोटी दंडापोटी जमा रक्कम व भाववाढ मिळणेबाबत केलेली विनंती प्राधिकरणाने मान्य केलेली नाही.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील बसस्थानकांची दुरुस्ती करून तेथे अद्ययावत**
**सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५) * ७१६२९ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.कुणाल पाटील (धुळे**

**ग्रामीण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत केलेल्या सर्वेक्षणाअंती राज्यातील ५७७ बस स्थानकांपैकी ३९४ बसस्थानकांची अत्यंत दुरवस्था झाली असून तेथे प्रवाशांना आवश्यक त्या कोणत्याही सोयी-सुविधा पुरविण्यात येत नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाने सार्वजनिक खाजगी भागिदारी अंतर्गत 'बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा' (बी.ओ.टी.) या धोरणानुसार बस स्थानकांचा पुनर्विकास करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१६ मध्ये परिवहन विभागाने राज्यातील बसस्थानकांचे बसपोर्टमध्ये रुपांतर करण्याचा प्रस्ताव तयार करुन मोक्याच्या जागा असलेल्या विविध बसस्थानकांच्या जागेचे मुल्यमापन करुन आराखडे तयार करण्याचे काम खाजगी कंपनीला देण्याचे निश्चित करुनही निविदा प्रसिध्द न झाल्याने हे काम अद्यापही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) त्यातच मुंबई सेंट्रल येथील राज्य परिवहन महामंडळाच्या जीर्ण झालेल्या मध्यवर्ती इमारतीच्या पुनर्विकासाचा ४६१ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असून दरम्यानच्या काळात तेथे छताचे प्लॅस्टर कोसळून दुर्घटना घडूनही अदयाप त्याची दुरुस्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त बसस्थानकांमध्ये दुरुस्ती व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवदेनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन राज्यातील राज्य परिवहन बसस्थानकांची दुरुस्ती व अद्ययावत सोईसुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) “हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान” संपूर्ण राज्यात राबविले जात असून पहिले सर्वेक्षण माहे मे-जून २०२३ या कालावधीत पार पडले. सदर अभियानाचा सर्वेक्षणाचा हा पहिला टप्पा असून बसस्थानकांना देण्यात येणाऱ्या १०० गुणांपैकी बसस्थानक परिसर व शौचालये-५० गुण, बसस्वच्छतेसाठी एकूण-२५ गुण, तसेच प्रवासी अभियानासाठी-२५ गुण अशी विभागणी केलेली आहे. तथापि, बसस्थानकांच्या सर्वेक्षणात ५० च्या आतील ३०९ बसस्थानके असून ५१ ते ७० गुणसंख्येतील बसस्थानकांची संख्या २२१ इतकी आहे. तसेच ७० गुणांच्या वरिल बसस्थानकांची संख्या ३० आहे. सदर अभियान प्रभावीपणे

राबविणेसाठी गुणसंख्येच्या अग्रस्थानी येण्यासाठी विभागांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. तसेच विभागीय तसेच स्थानिक पातळीवर बसस्थानकांच्या स्वच्छतेबाबत, बसेसच्या स्वच्छतेबाबतच्या घ्यावयाची दक्षता बाबतच्या सुचना वेळोवेळी प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत.

(२) व (३) प्रकल्पास विकासकांचा प्रतिसाद प्राप्त न झाल्याने प्रकल्प रखडले आहे. राज्यातील बसस्थानकांच्या आधुनिकीकरणाच्या मोहिमे अंतर्गत राज्यात विविध १३ ठिकाणी आधुनिक सुविधांनी युक्त बसतळ "बांधा-वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर उभारण्याच्या प्रस्तावास महामंडळ ठराव क्र.२०१६:०५:०६, दि.१८/०५/२०१६ नुसार १३ बसतळांना मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी छत्रपती संभाजीनगर व पनवेल या दोन प्रकल्प व्यतिरीक्त इतर ठिकाणी निविदा कालावधी वाढवून देखील विकासकांचा प्रतिसाद प्राप्त झाला नाही.

(४) छताचे प्लॅस्टर कोसळले हे खरे आहे परंतु कोणतीही दुर्घटना घडलेली नाही. सदर इमारतीच्या छताच्या प्लॅस्टरचे काम चालू आहे.

(५) नाही.

(६) राज्यातील बस स्थानकांची पुर्णबांधणी अथवा नव्याने उभारण्याबाबत सन २०१५-१६ च्या आर्थिक वर्षा पासून शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याअंतर्गत सन २०१५-१६ ते २०२२-२३ या कालावधीत ७२ बसस्थानकांची कामे पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरीत कामे प्रगतीपथावर तसेच प्रशासकीय मंजूरी, निविदा प्रक्रिया इत्यादी प्रक्रियेत आहेत.

सन २०२३-२४ करीता रा.प. महामंडळाच्या बसस्थानकाचे आधुनिकीकरण, पुनर्बांधणी व दर्जावाढ करणेकरीता रु.४०२.६४ कोटी रक्कमेची १०१ कामे प्रस्तावित करणेत आली आहेत.

-----------------

**नागपूर शहरातील अनेक वस्त्यांमधील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(६) * ७२७५६ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील विजयनगर, धरमनगर, लक्ष्मीनगर, भरतवाडा, नवकन्यानगर व कळमना मार्केट या वस्त्यांमध्ये मुलभूत सुविधांचा अभाव असून रस्त्यांची दुरवस्था झाल्याने स्थानिक रहिवाश्यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याचे दिनांक २ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील रहिवाशांना वर्षभर टँकरद्वारे पाणीपुरवठा होत असून त्याठिकाणी सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहिनीअभावी संपुर्ण परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तेथील रहिवाशांना मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नागपूर शहरातील अनधिकृत अभिन्यासाचे नियमितीकरण व विकास, शासन परिपत्रक दि.०६ डिसेंबर २००२ रोजी देण्यात आलेल्या निर्देशानुसार गुंठेवारी योजनेअंतर्गत अभिन्यासाचे नियमितिकरण नागपूर सुधार प्रन्यासाकडून करण्यात येते. विजयनगर, धरमनगर, लक्ष्मीनगर, भरतवाडा, नवकन्यानगर, कळमना मार्केट या अभिन्यासातील / वस्त्यांमधील भूखंडांचे अद्याप नियमितीकरण झाले नसल्याने तिथे मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या नाहीत.

(२) नागपूर महानगरपालिकेच्या जलप्रदाय विभागामार्फत "अमृत-१.०" योजनेअंतर्गत मौजा पुणापुर, भरतवाडा व पारडी या भागात जवळपास ४५ कि.मी. जलवाहिनी टाकण्यात आली आहे व यापैकी ३० कि.मी. जलवाहिनी कार्यान्वीत करून या भागात जवळपास ४७०० घरगुती नळ जोडण्या देण्यात आल्या आहेत. काही भागात टॅंकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. दि.३१.०३.२०२४ पर्यंत ही कामे पूर्ण करून टप्प्या-टप्प्याने टॅंकरद्वारे होणारा पाणीपुरवठा कमी करण्याचे नियोजन आहे.

या भागातील अभिन्यास हे गुंठेवारींतर्गत अद्याप नियमित झाले नसल्याने नागपूर सुधार प्रन्यासद्वारे सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था करण्यात आलेली नाही, यामुळे काही अंशी आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

(३) अनधिकृत अभिन्यासातील भूखंडके नियमित करण्याकरीता महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन, श्रेणी, वाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ अन्वये भूखंडाचे नियमितीकरण करण्याकरीता आवेदन अर्ज नागपूर सुधार प्रन्यासला प्रावधान उपलब्ध आहे. नियमितीकरणाकरीता आवश्यक शुल्क आकारून यानंतर मूलभूत नागरी सुविधा नागपूर सुधार प्रन्यासद्वारे अथवा सक्षम यंत्रणेमार्फत उपलब्ध करून देणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ, अमरावती, वाशिम व अकोला जिल्ह्यातील सीमा तपासणी नाक्यावर होत असलेली अवैध वसुली

**(७) * ७४०१५ श्री.नामदेव ससाणे (उमरखेड), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सेवा व वस्तू कर लागू झालेला असल्यामुळे परिवहन विभागाचे तपासणी नाके सुरु ठेवण्याची गरज नसतानाही यवतमाळ, अमरावती, वाशिम व अकोला या जिल्ह्यात परिवहन विभागातील प्रत्येकी दोन अधिकाऱ्यांची या तपासणी नाक्यावर नियुक्ती केली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपळखुटी तपासणी नाक्यावर (ता.केळापूर, जि.यवतमाळ) परिवहन विभागातील अधिकारी मालवाहतूकदारांकडून अवास्तव शुल्क वसुल करत असून या तपासणी नाक्यावर महिन्याकाठी कोट्यवधी रुपयांची अवैध वसूली करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच परीवहन कार्यालय, यवतमाळ येथे कर्मचारी असतांना खाजगी व्यक्तीची नियुक्ती करण्यात आल्याने त्यांच्याकडून वाहनधारकाकडे नियमीत कागदपत्रे असताना अतिरिक्त पैशाची मागणी करण्यात येत असल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) दै. लोकमत या मराठी वृत्तपत्रामध्ये दिनांक ३०.०९.२०२३ रोजी "इथे रांगेत भरतात अधिकाऱ्यांचे खिसे" अशा आशयाची बातमी प्रकाशित झाली आहे.

परिवहन आयुक्त कार्यालयाच्या आदेशानुसार सिमा तपासणी नाका पिंपळखुटी येथे प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती यांच्यामार्फत चक्राकार पध्दतीने अधिकारी / कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. त्यानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती येथील ४ व उप प्रापका, यवतमाळ-२, उप प्रापका, वाशिम-१ व उप प्रापका, अकोला-१ असे एकूण ०८ मोटार वाहन निरीक्षक व ०६ लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते.

सीमा तपासणी नाक्यावर नियुक्त मोटार वाहन निरीक्षक हे सीमा तपासणी नाक्यावरुन जाणाऱ्या वाहनांची अतिभार वाहतूक, अवैध प्रवासी वाहतूक, जनावरांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करुन दोषी आढळणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायदयातंर्गत दंडात्मक कारवाई करतात.

तसेच सीमा तपासणी नाका, पिंपळखुटी येथे कोणत्याही खाजगी इसमाची नेमणूक करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विश्रामबाग (जि.सांगली) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहात विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय**

**(८) * ७३२७५ श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विश्रामबाग (जि.सांगली) येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहात निकृष्ट दर्जाचे जेवण, निवासस्थानांची दुरवस्था, अभ्यासिकेतील गैरसोय तसेच इतर सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसतिगृहातील अधिक्षक, लिपिक व शिपाई आदींची पदे रिक्त असल्याने गत ११ वर्षापासून प्रभारींवर कार्यभार सोपवून ही कामे सुरु असून, महाविद्यालयातील शिक्षक, लिपिक यांना दर महिन्याला प्रति विद्यार्थी ६०० रुपये उदरनिर्वाह भत्ता गत दोन वर्षापासून अदा केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी विद्यार्थ्यांच्या सोयी-सुविधांकरिता झालेल्या खर्चाच्या पावत्या समाजकल्याण विभागाकडे देऊनही त्याची पूर्तता विभागाने केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या समस्यांबाबतची तक्रार विद्यार्थ्यांनी समाजकल्याण अधिकाऱ्यांकडे वारंवार केली असता, त्या विद्यार्थ्यांना हाकलून देण्याबाबतची सूचना संबंधित अधिकाऱ्यांनी अधिक्षकांना दिली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन वसतिगृहातील विद्यार्थ्यांना अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) दि.२६.७.२०११ च्या शासन निर्णयानुसार वसतिगृहास सोयी सुविधा पुरविण्यात येत आहेत. विश्रामबाग सांगली या वसतिगृहातील भोजन ठेकेदार बदलण्याबाबत केलेल्या आंदोलनास अनुसरुन दि.२०.१०.२०२३ अन्वये शक्ती महिला बचत गट, कुपवाड, जि.सांगली यांचा भोजन पुरवठा रद्द करुन संकल्प महिला बचत गट, सांगली यांची नियुक्ती केली आहे. या वसतिगृहातील अधिक्षक हे पद सन २०१९ पासून रिक्त असून लिपिक व शिपाई पदाचा कार्यभार अन्य कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे. तसेच ऑक्टोबर, २०२३ पर्यंत निर्वाह भत्ता अदा करण्यात आलेला आहे. तथापि काही विद्यार्थ्यांनी सहल व प्रोजेक्ट रिपोर्टची मागणी केली असून निधी अभावी ती प्रलंबित आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेतील बेकायदा बांधकामाच्या चौकशीच्या अहवालाची नस्ती गहाळ झाल्याबाबत

**(९) * ७३७२२ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्र तसेच कळवा, दिवा, मुंब्रा, परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत व बेकायदेशीर बांधकामे करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत बांधकामांसंदर्भात श्री.संजय खाडेगावकर यांच्या तक्रारीनुसार तत्कालीन आयुक्त डॉ.विपिन शर्मा यांनी सन २०१९ मध्ये चौकशी समिती गठीत केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनधिकृत व बेकायदेशीर बांधकामांचा अहवाल असलेली नस्ती गहाळ झाल्याची बाब दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू नस्तीमध्ये अनधिकृत बांधकामांची यादी, फोटो, व्हिडिओ सीडी, बांधकामांचे स्पॉट, अहवालाच्या नस्ती, ठराव व इमारतींची नावे इत्यादी महत्वाची माहिती समाविष्ट आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकामे तसेच नस्ती गहाळ प्रकरणी दोषी असणाऱ्या सर्व संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) ठाणे शहर क्षेत्रात निदर्शनास येणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येत असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) श्री.संजय घाडीगावकर यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या स्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी गठीत चौकशी समितीने चौकशी अहवाल नस्तीसह तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांना सादर केला असून उक्त अहवालाची नस्ती उपलब्ध असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

सदर नस्तीमध्ये न्यायालयामध्ये दाखल केलेल्या सत्यप्रतिज्ञा पत्र व त्यानुषंगाने सलग्न कागदपत्रे आहेत.

राज्यातील नागरी क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम / अतिक्रमणांवर कारवाई करण्याकरिता शासनाने दिनांक ०२.०३.२००९ रोजी सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. तथापि, ठाणे क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम / अतिक्रमणांवर नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील रुक्मिणीबाई रुग्णालयात माहिलेला प्रसुतीकरीता दाखल न करुन घेतल्याबाबत

**(१०) * ७१७२२ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) स्टेशनजवळील स्कायवॉकवर श्रीमती राबीचा साधू सिद या महिलेला प्रसूतीच्या वेदना सुरु झाल्याने जवळच्याच कल्याण महापालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात नेले असता हजर असलेल्या

डॉक्टरांनी बेजबाबदारपणे उत्तरे देऊन दाखल करुन न घेतल्याने रुग्णालयासमोर असलेल्या हातगाडीवर तिची प्रसूती झाल्याची घटना दिनांक ९ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर रूग्णाची प्रसुती बाई रूक्मिणीबाई रूग्णालयाच्या आवारात झाल्यानंतर रूग्ण व नवजात बालक यांना रूग्णालयात नेऊन त्यांची प्राथमिक तपासणी करण्यात येऊन, तदनंतर त्यांना महानगरपालिकेच्या प्रसुती विषयक नियमित सेवा उपलब्ध असलेल्या वसंत व्हॅली प्रसुतीगृह, कल्याण येथे महानगरपालिकेच्या रूग्णवाहिनेमार्फत पुढील उपचाराकरिता स्थलांतरीत करण्यात आले होते, ही वस्तुस्थिती आहे.

प्रस्तुत प्रकरणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून प्राथमिक चौकशी करण्यात आली असून, अहवालातील निष्कर्षानुसार एका वैद्यकीय अधिकाऱ्याला विहीत प्रक्रिया अवलंबून निलंबित करण्यात आले असून, त्यांच्याविरूध्द विभागीय चौकशीची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू आहे.

तर संबंधित दुसरे संबंधित वैद्यकीय अधिकारी बाह्यसंस्थेमार्फत उपलब्ध असल्याने संस्थेला त्यांच्या सेवा समाप्त करण्याबाबत कळविले असून, सदर सस्थेने त्यांची सेवा समाप्त केलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगाव (जि.नाशिक) शहराच्या विकास कामांकरिता वितरीत करण्यात आलेल्या निधीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(११) * ७१७६७ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) शहराच्या विकास कामांकरिता राज्य शासनाकडून कोटयवधी रुपयांचा निधी वितरित करण्यात आलेला असताना आयुक्त, महानगरपालिका यांनी निधी वाटपात भेदभाव करणे, निविदा प्रक्रिया प्रलंबित ठेवणे तसेच त्यांच्या मर्जीतील ठेकेदारांना कामे देऊन त्यांनी केलेल्या निकृष्ट कामाची देयके देखील अदा करुन मोठया प्रमाणात गैरव्यवहार केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच शहरातील विविध विकास कामाच्या निविदा काढण्यास जाणीवपूर्वक विलंब लावल्यामुळे कामे प्रलंबित राहिल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्तांना विचारणा केल्यानंतर त्यांच्याकडून समर्पक उत्तरे मिळत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी आयुक्त, महानगरपालिका यांच्या गैरकारभाराबाबत व कार्यपध्दतीबाबत अनेक तक्रारी करण्यात आल्या असून आंदोलनाचा देखील इशारा देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही,

सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (राज्यस्तर) योजनेखाली २२ कामांना कार्यादेश देण्यात आला असून ६ कामे पुर्ण झाली आहेत. १४ प्रगतीपथावर व २ सुरु झालेली नाहीत.

सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तर) या योजनेखाली ५० कामांपैकी ३९ कामांना कार्यादेश दिले आहेत. यापैकी ६ कामे पुर्ण झाली असून १० कामे प्रगतीपथावर तर २३ कामांना कार्यादेश दिलेले आहेत तर ११ कामे निविदा मंजूरीसाठी प्रस्तावित आहेत.

शासनाकडून वितरीत करण्यात आलेल्या निधी मंजूरीच्या शासन निर्णय/परिपत्रक कामांचे नावासह रक्कम नमूद करून मनपास प्राप्त आहे. योजनांची प्रशासकीय मान्यता जिल्हास्तरावरून होत असते तसेच प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा मागविण्यात येत आहेत. शासन निर्देशानुसार मनपा मार्फत रु.३ लक्ष अधिकच्या रकमेसाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे. निविदा प्राप्त झाले नंतर मंजूरीची कार्यवाही करून मंजूर मक्तेदार यांना कार्यादेश देण्यात येत आहेत.

(२) सदरील बाब अद्यापपावेतो निदर्शनास आलेली नाही, असे आयुक्त मालेगाव महानगरपालिका यांनी नमूद केले आहे.

(३) व (४) आयुक्त, मालेगाव महानगरपालिका यांच्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या असून याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला असून अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात विविध पदभरती परिक्षांकरिता अवास्तव शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत**

**(१२) * ७२६५३ श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने तलाठी, जिल्हा परिषद, वनविभाग अशा विविध विभागांमध्ये नोकर भरतीकरिता मागील ५ वर्षांमध्ये उमेदवारांकडून परिक्षा शुल्कापोटी रुपये ३३४ कोटी इतकी रक्कम घेतल्याचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भरतीपैंकी काही भरती ह्या पेपर फुटी व इतर कारणांमुळे रद्द करण्यात आल्या असतानाही शासनाकडून सदरहू भरतीचे ६७ कोटी रुपये इतके शुल्क अद्यापही उमेदवारांना परत करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात एमपीएसी, यूपीएससीव्दारे वर्ग १ आणि २ मधील पदाच्या परिक्षेसाठी सुध्दा अत्यंत कमी म्हणजेच १०० रुपये शुल्क आकारण्यात येत असतांना ‘गट-क’ च्या परिक्षेसाठी विद्यार्थ्यांकडून सुमारे ९०० ते १००० रुपये शुल्क आकारले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जास्त शुल्क आकारणीमुळे गरीब व होतकरु विद्यार्थ्यांच्या आर्थिक अडचणीमुळे या स्पर्धा परिक्षांमध्ये सहभागी होऊ शकत नसताना, दुसरीकडे घेतलेले शुल्क देखील परत न केल्यामुळे विद्यार्थी अधिकच अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात स्पर्धा परीक्षांच्या शुल्काच्या माध्यमातून परीक्षा घेणाऱ्या खाजगी कंपन्या करोडो रुपयांची कमाई करीत असून यात सुशिक्षित बेरोजगारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन या परिक्षा प्रक्रियेचे शुल्क कमी करणे तसेच रद्द झालेल्या परिक्षांचे शुल्क परत करणेसंदर्भात व यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) महसूल व वन विभागांतर्गत तलाठी पदाची भरती, ग्राम विकास विभागांतर्गत जिल्हा परिषदांमधील गट-क संवर्गातील पदभरती, वन विभागांतर्गत गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील पदभरती याअनुषंगाने एकंदरीत रु.१९२.५१ कोटी इतकी रक्कम परीक्षा शुल्कापोटी जमा झाली.
(२) ग्राम विकास विभागांतर्गत जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील गट-क संवर्गातील पद भरती ही दरम्यानच्या कालावधीत समांतर आरक्षणातील बदल, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्यांच्या प्रमाणात झालेला बदल इत्यादी कारणांमुळे ग्राम विकास विभागाच्या दि.२१ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णयाद्वारे रद्द करण्यात आली. त्यामुळे संबंधित उमेदवारांना परीक्षा शुल्क परत करण्यासाठी रु.२१,७०,६४,४२२/- इतकी रक्कम संबंधित जिल्हा परिषदांना वर्ग करण्यात आली असून त्यापैकी एकूण रु.२,७७,७२,७५०/- इतकी रक्कम ८५,५६७ उमेदवारांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली असून उर्वरित उमेदवारांना शुल्क परत करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

महसूल व वन विभागांतर्गत तलाठी व इतर पदांकरीतांच्या भरतीची परीक्षा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली नाही.
(३), (४), (५) व (६) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या गट अ व गट ब च्या पदांसाठीच्या स्पर्धा परीक्षांकरीता अराखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी पुर्व परीक्षा रु.५००/- व मुख्य परीक्षा रु.५००/- असे एकूण रु.१०००/- आणि मागासवर्गीय उमेदवारांकरीता पुर्व परीक्षा रु.३००/- व मुख्य परीक्षा रु.३००/- असे एकूण रु.६००/- इतके शुल्क आकारण्यात येते.

टिसीएस व आयबीपीएस कंपन्यांमार्फत स्पर्धा परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेताना परीक्षा प्रक्रिया सुलभतेने व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सीसीटिव्ही प्रणालीद्वारे चित्रीकरण, मोबाईल जॅमर, बायोमॅट्रीक उपस्थिती, आयरिस स्कॅन, उमेदवारांचे फ्रिस्किंग इत्यादी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करुन परीक्षा प्रक्रिया राबविली जाते. या सुविधांच्या माध्यमातून भरती प्रक्रिया अधिक कार्यक्षमतेने आणि पारदर्शकरित्या पार पाडण्याच्या हेतूने अराखीव उमेदवारांसाठी रु.१०००/- तर राखीव उमेदवारांसाठी रु.९००/- इतके परीक्षा शुल्काचे दर ठरविण्यात आले आहेत.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## समाज कल्याण विभागातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या साहित्य खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१३) * ७७८६३ श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या साहित्य खरेदीमध्ये ५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे विद्यापीठातील विद्यार्थी कृती समितीने व पतीत पावन संघटनेने उपरोक्त गैरव्यवहार करणाऱ्यांची चौकशी करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग व केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) दि.३१.८.२०२३ रोजीच्या लोकमत वृत्तपत्रामध्ये खरेदी ५९ कोटी भ्रष्टाचार ५० कोटी या मथळयाखाली प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त, समाजकल्याण यांचे अध्यक्षतेखाली चार सदस्यीय चौकशी समिती गठित करण्यात आली असून समितीची चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वसई-विरार (जि.पालघर) शहर महानगरपालिकेत बोगस कागदपत्रांद्वारे कंत्राट मिळविल्याबाबत**

**(१४) * ७७४३३ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका तसेच इतर चाळीस नगरपरिषदेत काम केल्याचा बोगस कागदपत्रांच्या आधारे वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिकेत सन २०१२ ते २०१८ या ६ वर्षांच्या कालावधीत कंत्राटी कर्मचारी पुरविण्याचा ठेका घेतलेल्या २५ ठेकेदारांनी सुमारे १२५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी विभागीय आयुक्त, कोकण भवन यांच्या कार्यालयामार्फत चौकशी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे पालघर जिल्हाध्यक्ष यांनी दिनांक २१ मार्च, २०२३ व दिनांक १५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, विभागीय आयुक्त (कोकण विभाग), जिल्हाधिकारी, पालघर आणि आयुक्त, वसई-विरार शहर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विभागीय आयुक्त (कोकण भवन) यांच्या कार्यालयामार्फत सुरु असलेली चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, त्याअनुषंगाने शासनाने संबंधित ठेकेदारांविरुद्ध फौजदारी स्वरुपाची कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या कार्यालयाकडून चौकशी सुरू आहे.

अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखा, मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय या कार्यालयाकडून अद्याप तपास सुरू आहे, तपासाअंती अंतिम अहवाल सादर करण्यात येईल असे विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तिवसा (जि.अमरावती) नगरपंचायत परिसरातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा होण्याबाबत

**(१५) * ७२९७८ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात मुबलक पाणी उपलब्ध असताना केवळ नियोजनाअभावी नागरिकांना दहा दिवसातून एकदा पाणी पुरवठा होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तिवसा नगरपंचायतीत पाणी नियोजनासाठी दरवर्षी लाखो रुपये खर्च केल्याचे कागदोपत्री दर्शवूनही शहराला नियमित पाणी पुरवठा न होणे तसेच बारा किलोमीटरवर असलेल्या वर्धा नदीवरुन पाणी आयात करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरीकांना नियमित पाणी पुरावठा सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

अमरावती शहरामध्ये पाणी पुरवठ्यासाठी प्रत्येक झोन निहाय दोन भागात विभागणी करून एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येतो.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

तिवसा नगरपंचायती करीता ग्रामपंचायतकालीन पाणी पुरवठा योजनेतून १२ कि.मी. अंतरावरुन वर्धा नदीतून पाणी घेण्यात येते, ही बाब खरी आहे. तथापि, सदर योजनेवर योग्य त्या दुरुस्त्या केवळ कागदोपत्री दर्शविण्यात येतात, ही बाब खरी नाही.

दरम्यान नागरिकांना नियमित पाणी पुरवठा होण्याच्या उद्देशाने तिवसा नगरपंचायतीकरीता महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत रुपये २७.९१ कोटी रकमेची पाणी पुरवठा योजना मंजुर करणेकरीता राज्यस्तरीय प्रकल्प समितीने दिनांक २०/१०/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता देऊन शासनास शिफारस केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंब्रा-शीळफाटा (जि.ठाणे) येथे होत असलेली अनधिकृत बांधकामे

**(१६) * ७३९०३ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा-शीळफाटा (जि.ठाणे) येथील मोकळया जागा, खारफुटीच्या जमिनी, जुन्या अनधिकृत इमारतींच्या जागांवर बेकायदेशीररित्या २०० ठिकाणी बांधकाम सुरु असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापुर्वी देखील लकी कंपाऊंडमधील सात मजली इमारत कोसळून त्यात ७४ जणांचा मृत्यू झाला असतानाही मुंब्रा आणि शिळफाटा भागामध्ये सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भागातील अनधिकृत इमारत बांधकामे पोलीस आणि महानगरपालिका प्रशासनाच्या आर्थिक संगनमताने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) सदर परीसरात अनधिकृत बांधकाम झाल्याचे निदर्शनास आले ही वस्तुस्थिती आहे. सदर अनधिकृत बांधकाम निदर्शनास आल्यानंतर त्यावर वेळोवेळी निष्कासनाची कारवाई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

दिवा प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर मोठया प्रमाणात कारवाई करण्यात आली असून त्यामध्ये पक्के व निम्नपक्के स्वरूपाच्या बांधकामावर कारवाई करण्यात आली आहे. तसेच काही बांधकामधारकांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच संबंधित सहाय्यक आयुक्त व बीट निरीक्षक यांच्याविरुध्द निलंबनाची कार्यवाही करण्यात आली असून शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु आहे.

त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अनधिकृत बांधकामांना पाणी पुरवठा व विद्युत पुरवठा न करण्याबाबत संबंधितांना कळविण्यात आले असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकृत हॉटेल थाब्यांवर प्रवाशांना अल्पोपहार स्वत दरात मिळत नसल्याबाबत

**(१७) * ७२५२० ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन महामंडळाने राज्यातील रा.प.च्या बसेसला शंभर पेक्षा जास्त अधिकृत थांबे घोषित करून त्या हॉटेलमध्ये नाश्ता व चहा ३० रुपये तसेच नाथ पाण्याची अधिकृत विक्री करण्याचे बंधन हॉटेल मालकांना करण्याचा निर्णय घेऊनही या योजनेनुसार प्रवाशांना या सुविधेचा लाभ देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हॉटेल मालक या योजनेची माहिती प्रवाशांना न देणे, योजना बंद झाल्याचे सांगणे, योजना माहिती दर्शनी भागात न लावणे, महागड्या दराने अन्नपदार्थ व बाटलीबंद पाण्याची विक्री करणे, तक्रार पुस्तक उपलब्ध नसणे इत्यादी असंख्य तक्रारी असतानाही रा.प.महामंडळाने त्याची कोणतीही दखल घेतली नसून यासंदर्भातील कोणतीही माहिती महामंडळाकडे उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हॉटेल चालकांकडून दररोज रोख स्वरुपात २०० रुपये प्रमाणे रक्कम रा.प. महामंडळात जमा करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रवाशांना या सुविधेचा लाभ देऊन संबंधित दोषी हॉटेल मालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) नाही.

लांब पल्ल्यांच्या बसेसला खाजगी हॉटेल येथे अधिकृत थांबा देतांना रुपये ३० मध्ये प्रवाशांना चहा नाश्ता योजना राबविण्याचे व रा.प.चे नाथजल पाणी विक्री करण्याचे बंधन हॉटेल मालकावर असते. याबाबत प्रवाशी तक्रार प्राप्त होताच संबंधित हॉटेल मालकाकडून खुलासा मागविण्यात येतो. तसेच हॉटेलला मार्गतपासणी पथकाकडून, जबाबदार पर्यवेक्षक अधिकारी यांच्याकडून प्रत्यक्ष भेट देऊन तक्रारीच्या अनुषंगाने वेळोवेळी तपासणी करण्यात येते, तपासणी दरम्यान त्रुटी आढळल्यास / रा.प. नियमांचा भंग झाला असल्यास, त्यावर रा.प. नियमानुसार कारवाई करण्यात येते.

(३) रा.प. महामंडळाच्या धोरणानुसार एखादया मार्गावर अधिकृत थांबा निश्चित करतांना, त्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ती सूचना राबविण्यात येते व सदर मार्गावर उच्चतम देकार देणाऱ्या व रा.प. अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या खाजगी हॉटेल थांब्याला, मा.अध्यक्ष, म.रा.मा.प. महामंडळ यांच्या मान्यतेने अधिकृत थांबा मंजूरी देण्यात येते व त्यानुसारच स्वारस्य अभिव्यक्ती सूचनेत प्राप्त झालेल्या देकारानुसार प्रत्येक फेरीनिहाय देकार रा.प. महामंडळात जमा करण्यात येतो.

(४) व (५) वेळोवेळी विभागातील मार्गतपासणी पथक, जबाबदार पर्यवेक्षक / अधिकारी यांच्याकडून विभागीय पातळीवर तपासणी करण्यात येते व रा.प. अटी व शर्तीचे उल्लंघन होत असल्याचे आढळल्यास कारवाई करण्यात येते.

-----------------

## नाशिक शहरातील सातपूर श्रमिकनगर भागातील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१८) * ७८२३५ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील सातपूर श्रमिकनगर भागातील रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण होण्यापुर्वीच रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामासाठी नगरसेवक निधीतून रु.४ कोटी खर्च करण्यात आले असून सदर रस्त्याचे काम संबंधित कंत्राटदाराने कार्यारंभ आदेश मिळून देखील विलंबाने सुरु करणे, कार्यारंभ आदेशाचे उल्लंघन करुन १२ मीटर ऐवजी ८ मीटर निकृष्ट दर्जाचा रस्ता तयार करणे, काम करताना सुरक्षाविषयक नियम न पाळणे परिणामी याच रस्त्यावर एका युवकाचा गंभीर अपघात होणे इत्यादी अनेक तक्रारींसंदर्भात माजी लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांचेकडे लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) व (३) नाही.

कामाचा कार्यारंभ आदेश मिळताच कामाची लाईन आऊट देऊन काम तातडीने सुरु करणेत आले आहे, सदर काम आजमितीस पुर्ण झालेले आहे. या ठिकाणी काम करतेवेळी सुरक्षा नियमांची मनपामार्फत पुरेपुर काळजी घेण्यात आली होती. सदर रस्त्यावर एका युवकाचा अपघात झाल्याची बातमी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली आहे

सदर कामाचे ठिकाणी पुर्ण रुंदीचा रस्ता विकसित करणेत आला आहे. सदरचे कामाचे मनपा गुणनियंत्रण विभागाकडून वेळावेळी तपासणी व चाचण्या करून घेण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर कामाचे शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक रोड या त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरिक्षण करणेत आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यातील कोलवॉशरीजकडून पर्यावरणविषयक नियम पाळले जात नसल्याबाबत

**(१९) * ७१६५८ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरवून दिलेले नियम चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यातील कोलवॉशरीजकडून पाळले जात नसून कोळसा वाहतूक व हाताळणी दरम्यान मोठया प्रमाणात प्रदूषण होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी यासंदर्भात प्रत्यक्षात पाहणी करून मे.विमला इन्फास्ट्रक्चर (इंडिया) प्रा.ली.चंद्रपूर, मे.रुख्माई कोलवॉशरीज यवतमाळ, मे.कार्तिकेय कोलवॉशरीज यवतमाळ, महामिनरल कोलवॉशरीज, चंद्रपूर, एन.एन.ग्लोबल मार्केटाईल प्रा.ली., चंद्रपूर आणि महामिनरल माईनिंग या कोलवॉशरीजला नोटीस बजावली असल्याची माहिती दिनांक २० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील पेपर मिल, स्टील प्लांट व सिमेंट उद्योगांकडून हवा व जल प्रदूषण होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊन नागरिकांना विविध आजार होत असून त्यात वाढ झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच प्रदूषण रोखण्यासाठी बसविलेले हवा व जल प्रदूषण नियंत्रण यंत्र कार्यान्वीत करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रश्नाधीन उद्योगांच्या करण्यात आलेल्या पहाणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने मे.विमला इन्फ्रास्ट्रक्चर (इंडीया) प्रा.लि. चंद्रपूर यांना दि.०५/१०/२०२३ रोजी, मे.रुख्माई कोलवॉशरीज, यवतमाळ व मे.कार्तिकेय कोलवॉशरीज, यवतमाळ यांना दि.०६/१०/२०२३ रोजी, मे.महामिनरल कोलवॉशरीज चंद्रपूर व मे.एन.एन.ग्लोबल मार्केटाईल प्रा.लि. चंद्रपूर या कोलवॉशरीज यांना दि.१९/११/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीशीच्या अनुषंगाने संबंधित उद्योंगाकडून खुलासा प्राप्त झाला असून याबाबत पुढील कायदेशीर कार्यवाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अचलपूर (जि.अमरावती) येथील अण्णाभाऊ साठे दलितवस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर विकासकामे केली नसल्याबाबत

**(२०) * ७२०५१ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि.अमरावती) येथील अण्णाभाऊ साठे दलितवस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर विकास कामे न करता ५.५० कोटी रुपयांचे देयके काढण्यात आल्याचे तपासणी पथक समितीच्या अहवालातून माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी प्रस्तावित मंजूर कामावर खर्च न करता अन्य ठिकाणी खर्च केल्याप्रकरणी विभागीय आयुक्त, अमरावती येथील सहआयुक्त, नगरपालिका प्रशासन यांनी जिल्हा सहआयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय यांना पत्र पाठवून तांत्रिक अहवालाच्या आधारे कार्यवाही करुन अहवाल पाठविण्याचे दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी निर्देशित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

तपासणी पथकाच्या अहवालात अशी कोणतीही बाब नमुद नाही.

(२) सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन, विभागीय कार्यालय, अमरावती यांनी दिनांक १८/७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये तपासणी अहवाल जिल्हा सह आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना पाठविला आहे, हे खरे आहे.

(३) या संदर्भात विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या कार्यालयाने दिनांक १८/७/२०२३ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे तपासणी अहवाल कार्यवाहीसाठी पाठविला असून त्यामध्ये अचलपूर शहरातील रोडच्या बाजूस पेव्हिंग ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक निष्काळजीपणे बनविल्याबाबत तसेच प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या जागेत बदल करण्यात आला असल्याचे निष्कर्ष नमूद केले आहेत. याबाबत संबंधीतांकडून खुलासा मागविण्यात येत असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील दुरवस्था झालेल्या रस्त्यांच्या कामाची चौकशी करण्याबाबत

**(२१) * ७१९८५ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील फेज-१ व फेज-२ येथील रस्त्यांच्या कामासाठी शासनाने रुपये २८ कोटी खर्च करुन देखील पहिल्या पावसाळ्यात रस्ता वाहून गेला असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पाचनंद नगर रहिवाशी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष, श्री.कासम मुलाणी यांनी सदरहू रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे सिडको अधिकाऱ्यांना स्वत: भेटून सांगण्यात आल्यानंतरही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) त्यानंतर श्री.मुलाणी यांनी सदर कामाची चौकशी करुन कंत्राटदार कंपनीला काळया यादीत टाकून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी देखील व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे माहे ऑगस्ट २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कंत्राटदार व संबंधित दोषी अधिकारी यांचेविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) तळोजा विभागातील पायाभूत सुविधांकरीता तळोजा फेज-१ व फेज-२ मध्ये रस्ते दुरुस्ती, पदपथ दुरुस्ती व उर्वरित पायाभूत सुविधा या कामांकरिता मे.पी.पी. खारपाटील कन्स्ट्रक्शन कंपनी यांना रु.२१.३७ कोटी रकमेचा कार्यादेश सिडको महामंडळाकडून देण्यात आला आहे. उक्त कामे फेज-१ मध्ये दि.१९/०४/२०२२ व फेज-२ मध्ये दि.२९.०३.२०२२ रोजी सुरु करण्यात आली आहेत. उक्त कामे पूर्ण करण्याचा निर्धारित कालावधी फेज-१ मध्ये माहे डिसेंबर, २०२३ असून फेज-२ मध्ये माहे जानेवारी, २०२४ असा आहे. सदर कामांचा दोष निवारण कालावधी काम संपल्यानंतर ३ वर्षांचा आहे.

तळोजा फेज-१ मधील रस्त्यांच्या डांबरीकरणाचे कामानंतर पावसाळा संपल्यावर झीज झालेल्या भागाचे दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे. रस्त्याच्या डांबरीकरणानंतर महानगर गॅस कंपनी पाईपलाईन टाकण्याचे काम व विद्युत विभागाकडून केबल टाकण्याचे काम करताना रस्त्यामध्ये झालेल्या खोदकामाची दुरुस्ती करण्यात आली आहे. तथापि, उक्त तळोजा येथील फेज-१ व फेज-२ मधील कामे पूर्ण करण्याचा निर्धारित कालावधी संपलेला नसून कामे सुरु असून प्रगतीपथावर आहेत.

यासंदर्भातील पाचनंद नगर रहिवाशी सामाजिक संस्थेचे दिनांक १९.०७.२०२३ च्या निवेदनाच्या अनुषंगाने सिडको महामंडळाच्या स्तरावर चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने उक्त कामांची संयुक्त पाहणी केली असून समितीचा अहवाल अंतिम टप्प्यात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाडा-मनोर (ता.वाडा, जि.पालघर) महामार्गावरील अंभई येथील फूड कंपनीतील रासायनिक सांडपाण्यामुळे शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान

**(२२) * ७७९६३ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा-मनोर (ता.वाडा, जि.पालघर) महामार्गावरील अंभई येथील फूड कंपनीतील रासायनिक दुषित सांडपाण्यामुळे भात शेतीचे नुकसान होत असून विहिरी व बोअरचे पाणी प्रदूषित होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी ग्रामपंचायत, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जिल्हाधिकारी, पालघर, व तहसीलदार, पालघर आदींकडे सातत्याने ग्रामस्थांनी तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी माहिती मिळाल्यानंतर डॉ. सिद्धार्ध सांबरे, सदस्य ग्राहक संरक्षण परिषद, पालघर यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष भेट देवून पाहणी करून याबाबत आढावा घेतल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडे सविस्तर पत्र पाठवून कंपनी विरोधात कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सांडपाण्याची शास्त्रशुध्द पद्धतीने विल्हेवाट लावून संबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्नाधीन विषयाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत तक्रारदार यांच्यासमवेत दि.२२/०८/२०२३ रोजी केलेल्या पाहणीदरम्यान सदर उद्योगाकडून कुठलेही औद्योगिक सांडपाणी कारखाना परिसराबाहेर येत असल्याचे आढळून येत नव्हते. तथापि, प्रश्नाधीन उद्योगाच्या मागच्या बाजूस असलेल्या नाल्याच्या पाण्याला काळा रंग आल्याचे तसेच नाल्याला मातकट रंगाचा फेस आल्याचे आढळून आले होते. यावरून सदर उद्योगामधून पाणी पावसाळ्यामध्ये पाणी वाहून नेणाऱ्या गटाराद्वारे बाहेर सोडण्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सदर उद्योगास दि.२४/०८/२०२३ रोजी समज पत्र, दि.३०/१०/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस व दि.१०/११/२०२३ रोजी अंतरीम निर्देश देण्यात आले असुन रु.५०,०००/- इतक्या रक्कमेची बँक हमी जप्त करण्याबाबत संबंधित बॅंकेला कळविण्यात आले आहे.

सदर उद्योगाने औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता प्राथमिक, द्वितीय व तृतीय स्वरूपाची औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारली असून प्रक्रियायुक्त औद्योगिक सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यात येतो व उर्वरित प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाणी हे कंपनीच्या आवारात अंदाजे ३ ते ३.५ एकरमध्ये असलेल्या बागबगीच्यासाठी वापरात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.